# मुंबई विद्यापीठ

## मतदारांसाठी सूचना

(१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ६७ व एकरूप परिनियम २०१७ नुसार निवडणूकांसाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पध्दतीनुसार एकल संक्रमणीय मताद्वारे व परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे मतदान असेल.

(२) जेवढे उमेदवार निवडणूकीत उभे असतील तेवढयाच उमेदवारांना मतदार मतदान करु शकेल.

(३) मतदान पत्रिकेवरुन मतदाराची ओळख कोणत्याही प्रकारे होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच मतदान पत्रिकेवर पसंतीक्रमाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची खूण, चिन्ह, सही ई. आढळल्यास मतपत्रिका अवैध ठरविण्यात येईल.

(४) फक्त निळया शाईचे बॉल पेन वापरावे.

(५) मतपत्रिकेवर इंग्रजी भाषेत किंवा मराठी भाषेत क्रमांकाने पसंतीक्रम दर्शवावे.

(६) मतपत्रिकेवर इंग्रजी व मराठी असे दोन्ही प्रकारचे पसंतीक्रम दर्शविण्यात येऊ नयेत. (The order of preference shall be either in English OR Marathi only)

(७) मतदान पत्रिकेवर पसंतीक्रम देताना (order of preference) एकाच पध्दतीचा अवलंब करावा. उदा. १० उमेदवार असल्यास त्यांच्या आडनांवाप्रमाणे मतदान पत्रिकेवर नावांचा समावेश असेल व त्यातील आपल्या पसंतीच्या कोणत्याही उमेदवारास पसंतीक्रम १ किंवा १ देणे बंधन कारक असेल. त्यानंतर क्रमांक २ किंवा २, ३ किंवा ३, ४ किंवा ४, ५ किंवा ५, ६ किंवा ६, ७ किंवा ७, ८ किंवा ८, ९ किंवा ९, १० किंवा १० असे पसंतीक्रम देता येतील.

(८) ०१/०१, रोमन I किंवा एक / ONE असे पसंतीक्रम देखील दर्शवू नयेत.

**वैध/अवैध मतदान पत्रिका** (काही उदाहरणे)

| उमेदवाराचे नांव | पसंती क्रम | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वैध | | | | अवैध | | | | |
| A | १ | २ | १ | २ | | ०१ | ७ | I | २ |
| B | | १ | | | २ | २ | ९ | VI | I |
| C | | ३ | २ | ३ | तीन | ३ | १० | II | ३ |
| D | | ४ | | | Four | ४ | | VII | ४ |
| E | | १० | | १ | Five | | ५ | III | |
| F | | ५ | ३ | | सहा | ६ | | VIII | |
| G | | ९ | | | | | | IX | |
| H | | ६ | | | | | ४ | V | |
| I | | ७ | | | | | २ | X | |
| J | | ८ | | | | | १ | IV | |
| | अ | ब | क | ड | ई | फ | च | छ | ज |

अ - मतपत्रिका वैध, ब - मतपत्रिका वैध, क - मतपत्रिका वैध, ड - मतपत्रिका वैध, ई - मतपत्रिका अवैध, फ - मतपत्रिका अवैध, च - मतपत्रिका दोन नंतर बाद होईल, छ - मतपत्रिका अवैध, ज - मतपत्रिका अवैध.

...2/-

* * * * *

Scanned by CamScanner

१. प्रत्येक मतदारास एक हस्तांतरणीय मत असेल.

२. मतदार त्याचे मत नोंदवताना –

(क) 'पसंतीक्रम' या स्तंभात ज्या उमेदवाराला मतदान करील त्या उमेदवाराच्या नावासमोर त्याच्या मतपत्रिकेवर अंक '१' नमूद करील;

(ख) याशिवाय, त्याला जेवढ्या अन्य उमेदवारांना मत द्यायचे असेल त्यांच्या संबंधित नावासमोर त्याची निवड किंवा पसंतीक्रम अंक '२','३','४' असे सलग अंक नमूद करून दर्शवेल;

(ग) त्याच्या मतपत्रीकेवर त्याचे सर्व पसंतीक्रम एकतर इंग्रजी भाषेत किंवा मराठी भाषेत नमूद करील;

(घ) पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करणार नाही.

**मतदान पत्रिकेवरुन** मतदाराची ओळख कोणत्याही प्रकारे होणार **नाही याची काळजी** घ्यावी. तसेच मतदान पत्रिकेवर पसंतीक्रमाव्यतिरीक्त कोणत्याही प्रकारची खुण, चिन्ह, सही इ. आढळल्यास मतपत्रिका अवैध ठरविण्यात येईल.

Scanned by CamScanner